|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६


जळगाव दि. २१ ( प्रतिनिधी ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधरांमधून निवडून द्यावयाच्या दहा जागांसाठी आज रविवार, दि. २१ जानेवारी रोजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २६ मतदान केंद्रांवर अत्यंत शांततेने मतदान झाले. मतदानाची सरासरी टक्केवारी **४४.६६** अशी आहे.

या निवडणूकीसाठी ३२ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये अराखीव संवर्गातून पाच उमेदवार अधिसभेवर निवडून द्यावयाचे आहेत. त्यासाठी १८ उमेदवार रिंगणात आहेत. अनुसूचित जाती संवर्गातून एक उमेदवार निवडून द्यावयाचा असून तीन उमेदवार उभे आहेत. अनुसूचित जमाती संवर्गातून एका जागेसाठी दोन उमेदवार रिंगणात आहेत. विमुक्त जातींमधून एका जागेसाठी तीन उमेदवार तसेच इतर मागासवर्गातून एका जागेसाठी देखील तीन उमेदवार उभे आहेत. महिलांमधून एका जागेसाठीही तीन उमेदवार रिंगणात आहेत.

अधिसभा नोंदणीकृत पदवीधरांसाठी एकूण २३ हजार ७३९ मतदार नोंदणी झाली होती. रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ ही मतदानाची वेळ होती. जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्हयात २६ मतदान केंद्रावर ६६ बुथवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली होती. सर्व मतदान केंद्रांवर अत्यंत शांततेने मतदान झाले. पदवीधर मतदारांसाठी एकूण सहा प्रकारच्या मतपत्रिका होत्या. सकाळी काही मतदान केंद्रांवर प्रारंभी कमी मतदान झाले. पहिल्या दोन तासात दहा टक्क्याच्या आत मतदान झाले. दुपार नंतर मतदानाचा वेग थोडया प्रमाणात वाढला. सायंकाळी पुन्हा वेग मंदावला. मतदान केंद्रांवर उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी सकाळी जळगाव शहरातील मु.जे.महाविद्यालयातील मतदान केंद्राला भेट दिली. त्यानंतर ते विद्यापीठात दिवसभर थांबून होते व वेळोवेळी मतदानाचा आढावा घेत होते. प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी धुळे, अमळनेर, चोपडा, धरणगाव, पारोळा आणि एरंडोल येथील मतदान केंद्रांना भेटी दिल्या. कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी भ.भा.पाटील यांनी जळगाव, भुसावळ, फैजपूर, रावेर, जामनेर येथील मतदान केंद्रांना भेटी देवून मतदानाचा आढावा घेतला. त्यांच्या समवेत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी होते. सर्व मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बुधवार,दि.२४ जानेवारी रोजी विद्यापीठ परिसरातील कर्मचारी भवनात मतमोजणीला सकाळी ८.०० वाजता प्रारंभ होणार आहे.

सायंकाळी मतदान संपल्यानंतर दूरध्वनीद्वारे प्राप्त झालेली केंद्रनिहाय मतदानाची सरासरी टक्केवारी पुढीलप्रमाणे- १) मु.जे.महाविद्यालय, जळगाव (३३.२५ टक्के), २) पी.ओ.नाहाटा महाविद्यालय, भुसावळ ( ३४.८१ टक्के), ३) जी.जी.खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर ( ४७.५९ टक्के ), ४) धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर (३५.१८ टक्के ), ५) व्ही.एस.नाईक महाविद्यालय, रावेर (४७.२३ टक्के), ६) प्रताप महाविद्यालय,अमळनेर (५४.९१ टक्के), ७) डी.एस.पाटील महाविद्यालय, एरंडोल ( ६४.९३ टक्के), ८) एम.एम.एस. महाविद्यालय, पाचोरा ( ६४ टक्के), ९) य.ना.चव्हाण महाविद्यालय, चाळीसगाव (४८.११ टक्के), १०) जामनेर तालुका एज्युकेशनचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जामनेर ( ७१.२५ टक्के ), ११) महात्मा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (४४.५५ टक्के )

..२...

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६



१२) किसान कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारोळा ( ४६.१५ टक्के), १३) प.रा.हायस्कूल सोसायटीचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव (४२.९५ टक्के), १४) जेडीएमव्हीपीचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल ( ४३.९० टक्के ), १५) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड (६० टक्के), १६) झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे (३६.७५ टक्के), १७) सि. गो. पाटील महाविद्यालय, साक्री ( ३० टक्के), १८) एस.पी.डी.एम.महाविद्यालय, शिरपूर ( ४४.६२ टक्के), १९) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिंदखेडा ( ६७.४६ टक्के ), २०) पी.बी.बागल कला व वाणिज्य महाविद्यालय, दोंडाईचा (५० टक्के ) २१) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर ( ६२.८६ टक्के ) २२) जी.टी.पी.महाविद्यालय, नंदूरबार ( ५२.४१ टक्के ), २३) सु.हि.नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर ( २८.३६ टक्के ), २४) पी.एस.जी.व्ही.पी.चे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा ( ४४.२२ टक्के ), २५) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तळोदा ( ५८.७६ टक्के ) , २६) विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा ( ५६.२२ टक्के )

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २१ जानेवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी